॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad
Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/४३५ दिनांक ०७/११/२०२३

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी (NIC) रा.से.यो. स्वंयसेवक/स्वंयसेविका यांना निवडी साठी पाठविणे बाबत.**

संदर्भ:१)भारत सरकार, युवा कार्य एवं खेल मंत्रालय, रा.से.यो. क्षेत्रिय निदेशालय, पुणे यांचे जा.क्र.F.No.18/NIC/RD-Pune/Jalgaon/2023-24/328-353 Dated 18-10-2023.
२) या कार्यालयाचे जा.क्र. रासेयो/२०२३–२४/४२४, दिनांक २८/१०/२०२३ परिपत्रक
३) या कार्यालयाचे जा.क्र. रासेयो/२०२३–२४/४३०, दिनांक ०१/११/२०२३ परिपत्रक

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये भारत सरकार, युवा कार्य एवं खेल मंत्रालय, रा.से.यो. क्षेत्रिय निदेशालय, पुणे यांनी **राष्ट्रीय एकात्मता शिबीर (NIC)** चे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे दिनांक ३० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे व त्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाकडून ०३ स्वंयसेवक **व** ०३ स्वंयसेविका यांची निवड करून पाठविण्यात येणार आहे तथापी संदर्भ क्र. ३ अन्वये तांत्रिक अडचणी मुळे दिनांक ०२ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेले निवड शिबीर रद्द करण्यात आल्याबाबत आपणास कळविण्यात आले होते.

तरी या परिपत्रकान्वये रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील स्वंयसेवक अथवा स्वंयसेविका ज्यांना कला, संस्कृती, परंपरा, भाषा, पोशाख यांचे ज्ञान अवगत असलेल्या ०१ रा.से.यो. स्वंयसेवक किंवा ०१ स्वंयसेविका यांना **राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी (NIC)** निवडीसाठी **गुरूवार दिनांक ०९ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता** विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात पाठवून सहकार्य करावे, ही विनंती. सदर निवड शिबीरासाठी पाठविण्यात येणा–या स्वंयसेवकांचा प्रवास खर्च रा.से.यो. च्या नियमित अनुदानातून देय राहील.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.